उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक ५ ची घोषणा व त्यामध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या तपासणीसाठी मुख्य नियोजनकार (नैना), ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परीयोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध राहतील. सदर सूचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.* येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगररचना योजना ५ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

**उत्तरेला** —२३ गावांमधील चिपले(टीपीएस-२) व विहिघर(टीपीएस-३) गावांच्या हद्दी

**पूर्वेला** —२३ गावांमधील विहिघर(टीपीएस-३) व मोहो गावांच्या हद्दी

**दक्षिणेला** —२३ गावांमधील शिवकर गावाची हद्द

**पश्चिमेला**—मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग.

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**व्ही. वेणू गोपाल,**
मुख्य नियोजनकार (नैना).

**नोंदणीकृत कार्यालय** : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१,

दिनांक २६ जून २०१९.

